“शरद पवार ग्रामसमृद्धी योजना” राज्य योजना म्हणून राबविणेबाबत

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग (रोहयो प्रभाग)
शासन शुद्धिपत्रक क्र. : मग्रारो-२०२०/प्र.क्र.७०/रोहयो-७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : १७ मार्च, २०२३

वाचा :-

शासन निर्णय क्र.मग्रारो २०२०/प्र.क्र.७०/रोहयो-७, दि.३/०२/२०२१

शुद्धिपत्रक :-

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी याजेनेअंतर्गत काही योजनांच्या संयोजनातून (Combination) शरद पवार ग्रामसमृद्धी योजना राज्य योजना राबविण्यास शासन मान्यता देण्यात आली आहे. या शासन निर्णयात गाय व म्हैस यांच्याकरिता पक्का गोठा बाधण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार गोठ्यांच्या प्रस्तावासोबत जनावरांचे टॅगिंग आवश्यक राहील, असे नमूद करण्यात आले आहे. बँकऋण घेऊन किंवा पशुसंवर्धन वा अन्य विभागामार्फत वाटप करण्यात आलेल्या गाय, म्हैस यांना टॅगिंग करण्यता येते. तथापि, स्वखर्चाने घेतलेल्या जनावरांना टॅगिंग नसल्याने गोठे देण्यासंदर्भात अडचणी निर्माण होतात व लाभार्थी पात्र असूनदेखील या योजनेतील लाभापासून वंचित राहतात. सदर बाबीसंदर्भात सुधारणा करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. त्यानुसार उपरोक्त संदर्भीय शासन निर्णयामधील **अ.क्र.१)** मधील **अनुज्ञेयता** मुद्यातील दुसऱ्या परिच्छेदातील

“गोठ्यांच्या प्रस्तावासोबत जनावरांचे टॅगिंग आवश्यक राहील.”

या ऐवजी

“संबंधित ग्रामसेवक / तांत्रिक सहाय्यक / ग्राम रोजगार सेवक यांनी पंचनामा करुन लाभार्थ्यांकडे उपलब्ध जनावरांची आकडेवारी प्रमाणित करावी. पंचनामा करतांना ग्रामसेवक, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षकांपैकी एक किंवा इतर शासकीय कर्मचाऱ्यापैकी कोणीही एक हजर असणे आवश्यक राहील. ” असे वाचण्यात यावे.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२३०३१७१३०६१३२६१६ असा आहे. हे शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by NANDKUMAR VERMA
Date: 2023.03.17 13:28:52 +05'30'

(नंद कुमार)
अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत -

१) सर्व विभागीय आयुक्त
२) आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र, नागपूर

३) सर्व जिल्हाधिकारी
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा
५) उपआयुक्त (रोहयो) विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व विभाग
६) उप जिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, सर्व जिल्हे
७) उपमुख्यकार्यकारी अधिकारी (रोहयो / ग्रामपंचायत), सर्व जिल्हा परिषद
८) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परीक्षा) मुंबई / नागपूर
९) महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई / नागपूर
१०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
११) सहाय्यक संचालक (लेखा), रोहयो-७, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) निवड नस्ती (रोहयो-७)

प्रत माहितीसाठी,

१. मा.मंत्री (रोहयो) यांचे खाजगी सचिव
२. अपर मुख्य सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहायक